# University of Mumbai

## तातडीचे/अति महत्वाचे

Academic Appointments & Quality Assurance (Statistical Cell)
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

**No.UDSTAT/ICD/MIS/2020-21/ 56 of 2021**

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHEMIS) शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ऑनलाईन माहिती भरणेबाबत.(www.dhemis.maharashtra.gov.in)**

**संदर्भ : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे यांचे क्र.उशिस/सांख्यिकी/एमआयएस/२०२०-२१/९०४५, दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजीचे पत्र**

---

**परिपत्रक :-**

मुंबई विद्यापीठ संलग्नित/मान्यताप्राप्त सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक तसेच समन्वयक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, आंबडवे, ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी व विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग यांचे लक्ष उपरोक्त नमुद विषयाबाबतचे मा. संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचे प्राप्त झालेल्या संदर्भीय पत्राकडे वेधण्यात येत आहे (प्रत संलग्न). सदर पत्रान्वये माननीय संचालकांनी असे कळविलेले आहे की, उच्च शिक्षण संचालनालयाने सन २०२०-२१ या वर्षाच्या माहिती नोंदणीचे वेब लिंक www.dhemis.maharashtra.gov.in दिनांक १ जानेवारी पासून उपलब्ध करून दिलेली आहे. सन २०२०-२१ करीता सहसंचालक कार्यालये व उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिनस्त सर्व अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित सर्व महाविद्यालयांनी नोंदविणे अनिवार्य आहे. माहिती नोंदणीचे काम व त्यानंतर नोंदविलेल्या माहितीची वैधता पडताळणी करून आवश्यक तेथे दुरूस्ती करण्याचे काम सर्व सहसंचालक कार्यालये, विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालयांनी दिनांक ३१ जानेवारी, २०२१ अखेर निश्चितपणे पुर्ण करावयाचे आहे. तसेच सन २०२०-२१ च्या माहिती नोंदणीच्या कामाचा अहवाल संचालनालयाकडून तातडीने शासनास सादर करावयाचा असल्याने वरील माहिती नोंदणीचे व वैधता पडताळणी करण्याचे काम तातडीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**MIS - व्यवस्थापकीय माहिती :-**

**शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाकरीता संचालनालयाकडून विचारण्यात आलेल्या ऑनलाईन पद्धतीनुसार प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती आपल्या महाविद्यालयाकडून नोंदविण्यासाठी संबधित काम हे संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने ती संचालनालयास दिनांक १९ जानेवारी २०२१ अखेर विनाविलंब सादर करणे आवश्यक आहे. तरी सर्व संबंधितांनी वेब पोर्टलवर माहिती विनाविलंब दिनांक १९ जानेवारी, २०२१ पर्यंत सादर करून नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त होईल, याची खात्री करून घ्यावी.**

**त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालय/संस्थेमार्फत भरण्यात आलेल्या ऑनलाईन माहितीमध्ये पुढीलप्रमाणे नमुद ब-याचश्या/काही त्रुटी संचालनालयाच्या निदर्शनास आलेल्या आहेत.**

**१. माहिती नोंदणी करताना काही महाविद्यालये विशेषतः विनाअनुदानित महाविद्यालये प्रणाली मधील सर्व मॉडयूल्सची माहिती भरत नसल्याचे आढळले. मॉडयूल्स मधील विशेषतः शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती व्यवस्थितपणे व पुर्णपणे भरली जात नाही.**

२. **माहिती भरताना नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त दर्शविण्यात येते. तसेच नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जात नाही, केवळ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जाते.**

३. **शासकीय/अनुदानित/अंशतः <u>अनुदानित/विनाअनुदानित/ग्रामीण/शहरी/आदिवासी/केवळ</u> मुलींकरीता/अल्पसंख्यांकांचे महाविद्यालये (भाषिक/धार्मिक) याबाबतचे वर्गीकरण महाविद्यालयामार्फत व्यवस्थितरित्या प्रणालीमध्ये दर्शविले जात नाही. त्यामुळे वरील बाबींच्या राज्य स्तरावरील एकूण आकडेवारीमध्ये तफावत आढळून येते.**

उपरोल्लेखित सर्व बाबींचा विचार करता आपल्या असे निदर्शनास आणून देण्यात येत आहे, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध शैक्षणिक बाबींची महत्वपुर्ण माहिती ही प्रती शैक्षणिक वर्षानुसार वेबपोर्टलवर उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार ऑनलाईन स्वरूपात भरणे व त्याचप्रमाणे महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहीनिशी परिपुर्ण असलेल्या प्रमाणपत्रासहीत विद्यापीठास सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा कोणतीही विद्यापीठीय कार्यालयीन कार्यवाहीची पुर्तता **<u>हमीपत्र/प्रमाणपत्राविना</u>** करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच संबंधित सर्वेक्षणाच्या कामकाजाबाबत एखादया कोणत्याही महाविद्यालय/संस्था यांनी आपली संबंधित ऑनलाईन स्वरूपातील माहितीबाबतची नोंद न केल्यास त्यांची नावे काळया यादीत (Black List) दाखविण्यात यावी व विद्यापीठ वेबसाईट वर Highlight करून दर्शविण्यात यावेत, असे आदेश देखील मा. संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे, यांनी दिलेले आहेत, याची कृपया नोंद घ्यावी

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील अधिका-यांना संर्पक साधावा.

| **Contact Person** | **Office** | **Land Line No.** | **E-mail ID** |
|---|---|---|---|
| Nodal Officer (AISHE/MIS Cell) | University of Mumbai, Academic Appointments & Quality Assurance ( Statistical Cell) Room No. 202, Fort, Mumbai- 400 032. | 022 - 2261 8987<br>022 - 6832 0052 | supt.statunit@gmail.com |
| MIS, DHE-Pune Call Centre | Director of Higher Education, Government of Maharashtra, Pune. | 020 – 2970 7093 | stat.dhepune@nic.in |

**सूचना : १. MIS बाबतची माहिती फक्त कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी अभ्यासक्रम असलेल्या महाविद्यालयांनी भरणे ग्राहय राहील. (वास्तूशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन व औषधशास्त्र अभ्यासक्रम वगळता)**

**२. तसेच सदरची ऑनलाईन माहिती दिनांक <u>१९ जानेवारी २०२१</u> पर्यंत भरणे व संबंधितबाबतचे प्रमाणत्र/हमीपत्र दिलेल्या तारखेस किंवा शक्य असल्यास त्या अगोदर घेणे अनिवार्य आहे.**

**३. ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्षे २०१९-२० व २०२०-२१ करीता AISHE, MIS व Students on Roll वेबपोर्टलवर नोंदणी (Registration) करून घेतलेली नसल्यास सांख्यिकी कक्षाशी त्वरीत संपर्क साधावे.**

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १ जानेवारी, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

**(अ) प्रत माहिती करीता सविनय सादर :-**

१. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
२. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४०००01
३. सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, जि. रायगड -४१०२०६

**(ब) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :-**

१. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
२. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
३. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
४. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
५. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, पात्रता/नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
७. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी - ४१५६३९.
९. सहायक कुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२
१०. सहायक कुलसचिव, ठाणे उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, ठाणे-४०० ६०८.
११. सहायक कुलसचिव, कल्याण उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, कल्याण.
१२. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
१३. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.

**आपणांस कळविण्यात येते की, MIS बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्नीत महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून विद्यापीठाकडून MIS बाबत नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त न करण-या विभागाचे / महाविद्यालये / संस्थेच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी / पात्रता अर्ज (Enrollment/EligibilityForm) महाविद्यालयाची संलग्नता (Continuation / Extension) / प्राचार्य / शिक्षक मान्यता (Approval), परिक्षा अर्ज (Exam Form) व महाविदयालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये असे आदेश मा. संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन, पुणे, आणि मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, याची आपण प्रमुख या नात्याने गांभिर्याने नोंद घ्यावी.**

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

**Academic Appointments & Quality Assurance**

**(Statistical Cell), Fort**

## <u>माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) २०२०-२१</u>

-: <u>प्रमाणपत्र</u> :-

**महाविद्यालयाचे नाव व पत्ता**______________________________________________

_________________________________________________________________

**दुरध्वनी क्र. :** ______________________

**ईमेल आयडी :** ______________________

असे प्रमाणित करण्यात येते की, **<u>माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)</u>** महाविद्यालयीन शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबतची माहिती वेबपोर्टलवर नोंदविली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आली आहे. त्याबाबत काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयीन प्रमुख या नात्याने सर्वस्वी जबाबदारी माझी आहे, याची मी ग्वाही देतो/देते.

**दिनांक :**

**ठिकाण :**

**(स्वाक्षरी)**

**प्राचार्य**

**संस्थेचे नाव व सील**

---

**(कार्यालयीन कामकाजाकरीता)**

## <u>ना-हरकत प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, ______________________________________

_________________________________________________________________

या महाविद्यालयाने **<u>माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)</u>** बाबतची शैक्षणिक वर्षे **<u>२०२०-२१</u>** ची माहिती वेबपोर्टलवर नोंदविली आहे. **<u>सदर महाविद्यालयाकडे MIS बाबतची कोणतीही माहिती प्रलंबित नाही</u>**. सबब सदरील महाविद्यालयाची कार्यालयीन काम विद्यापीठ संस्थेकडून पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

**नोडल अधिकारी**

**(AISHE/MIS Cell)**

**Academic Appointments & Quality Assurance**

**University of Mumbai**

दिनांक :

ठिकाण :